# आयोजकांच्या नजरेतून इम्टेक्स



व्ही. अंबु

**व्ही. अंबु 'इंडियन मशिन टूल मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन'चे (IMTMA) डायरेक्टर जनरल आणि सीईओ असून, ते 'बंगळुरू इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर'चेही (BIEC) सीईओ आहेत. IISc मधून अभियांत्रिकी पदवी घेतलेल्या व्ही. अंबु यांना उद्योगक्षेत्रातील 27 वर्षांहून अधिक अनुभव आहे. 'उद्यम प्रकाशन'च्या संपादकांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी दिलेली मनमोकळी उत्तरे...**

**इम्टेक्ससारखे प्रदर्शन आयोजित करण्यामागे आपली प्रमुख उद्दिष्टे काय असतात? आपण ही उद्दिष्टे कशी ठरविता? ही उद्दिष्टे साध्य होतील याची खात्री कशी करता? भारतीय उद्योग क्षेत्रातील बदलांनुसार आपण आपल्या उद्दिष्टांमध्ये वेळोवेळी सुधारणा करता का?**

**इम्टेक्सची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.**

अ) जगभरातील उत्पादन तंत्रज्ञानांमधील प्रगती भारतीय उत्पादन क्षेत्राच्या उंबरठ्यावर आणून ठेवणे आणि भारतीय उत्पादने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तोडीसतोड व्हावी असा प्रयास करणे.

आ) नव्याने वाढीस लागलेल्या उत्पादन क्षेत्राच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मशिन टूल उत्पादकांच्या क्षमता वाढविणे.

इ) मशिन टूल उत्पादक आणि त्यांचे वापरकर्ते यांच्यात दृढ व्यावसायिक संबंध निर्माण करण्यासाठी त्यांना एका मंचावर आणणे.

ई) भारतीय उत्पादन आणि मशिन टूल उद्योग तसेच तंत्रज्ञानाद्वारे समस्या निराकरण करणाऱ्या व्यक्ती/संस्था यांच्या क्षमतेचे दर्शन बाह्य जगाला करून देणे.

प्रत्येक औद्योगिक संघटनेकडे त्यांच्या उद्योगक्षेत्राचा विकास करण्यासाठी एक व्हिजन आणि ते साकार करण्यासाठीचा कार्यक्रम असतो. इम्टेक्ससारखी प्रदर्शने त्यांना त्यांचे व्हिजन साकारण्यात मदत करतात.

प्रदर्शनाची उद्दिष्टे बदललेली नाहीत, तथापि त्यात प्रदर्शित होणाऱ्या उत्पादनांचे आणि भाग घेणाऱ्या उद्योजकांचे स्वरूप आणि वैविध्य अधिकाधिक विस्तृत होत चालले आहे आणि प्रदर्शनाच्या प्रत्येक वर्षी तंत्रज्ञानातील ताजे बदल आपल्याला जवळून पाहण्यास मिळत आहेत.

**तुम्हाला या प्रदर्शनांतून उद्भवणारी एखादी विशिष्ट थीम दिसते का? मागील दशकांपासून आजपर्यंत थीममध्ये होणाऱ्या बदलांकडे आपण कसे पाहता?**

इम्टेक्ससारख्या प्रदर्शनाची कोणतीही विशिष्ट थीम नसते. तथापि विकास आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने जग प्रगतीपथावर असल्याने नवीन उत्पादने आणि तंत्रज्ञान सादर करण्याच्या संधी वाढत आहेत.

**आपण या प्रदर्शनांची तयारी कशाप्रकारे करता? त्यासाठी किती वेळ लागतो? नवीन संभाव्य ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आपल्या मते कोणता पर्याय सर्वोत्तम आहे? आपण इम्टेक्स 2019 मध्ये सहभागी झालेल्या नवीन (भारतीय अथवा आंतरराष्ट्रीय) उत्पादकांची ओझरती झलक द्या.**

कोणत्याही प्रदर्शनाची सफलता, त्यात सहभाग घेणारे प्रदर्शक आणि त्याला भेट देणारे पाहुणे यांच्या अपेक्षांची किती प्रमाणात पूर्ती होते, त्यावर अवलंबून असते. एक औद्योगिक संघटना म्हणून आम्ही या प्रदर्शनाच्या नियोजनासाठी आणि तयारीसाठी भरपूर वेळ खर्च करतो, जेणेकरून सर्वकाही सुरळीतपणे पार पडेल. सर्व नियोजन आणि तयारी एका सुस्पष्ट प्रक्रियेद्वारे केली जाते आणि त्यात नवीनतम तंत्रज्ञानाचे साहाय्य घेतले जाते. यामुळे आम्ही व्यावसायिकदृष्ट्या प्रदर्शन आयोजित करण्यास सक्षम होत असतो आणि इम्टेक्स हे याचे निर्विवाद उदाहरण आहे. इम्टेक्स 2019 आणि टूलटेक 2019 या प्रदर्शनांमध्ये 20 देशांचा सहभाग असेल आणि 7 देशांची (चीन, जर्मनी, कोरिया, स्पेन, तैवान, यू.के. आणि अमेरिका) स्वतंत्र दालने असतील.

ACCUSHARP
Cutting Tools Pvt. Ltd.
An ISO 9001:2015

CUT FAST
An ISO 9001:2015
CUT COST

# Manufacturers of Metal Cutting Tools




WE STAND AS YOUR PRODUCTIVITY PARTNER

## ASSURING

- Right Quality
- Shortest Lead Time
- Cost Effective
- On-Time Delivery
- Innovative Approach

***We are for those, who are in Metal Cutting!***




***And For Many Other Industry Sectors***

**Head Office & Factory:**
W-242, J Block, MIDC, Bhosari, Pune – 411026.
Maharashtra, (India) Tel.: 020-27129016
Email: accusharp@accusharp.co.in I www.accusharp.co.in

**Mr. Ayaz Shaikh**
Marketing Director
Mobile: +91 9822017832
Email: ayaz@accusharp.co.in

***LOGISTIC NETWORK, ALLOVER INDIA, CLOSE TO CUSTOMER'S DOOR***

**OUR BRANCHES:**
• Uttaranchal • Delhi • Kolhapur • Ahmedabad • Indore • Nashik • Bangalore • Hyderabad

TÜV AUSTRIA
CERTIFIED
EN ISO 9001
CERTIFICATE NO. 20 100 112006739
TUV AUSTRIA CERT GMBH

www.odcindia.co.in

Visit Our Stall at IMTEX 2019 - Hall No. 3A | Stall No. F101

**प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण होण्यासाठी आपण लघु, मध्यम उद्योजक आणि मोठ्या प्रमाणात उत्पादन करणाऱ्या कंपन्यांसाठी वेगवेगळे धोरण अवलंबिता का?**

इम्टेक्समध्ये लघु, मध्यम उद्योजक आणि मोठ्या प्रमाणात उत्पादन करणाऱ्या कंपन्या यामध्ये काहीही फरक केला जात नाही. भेट देणारे आपापल्या आवडीनिवडीनुसार कोणत्या दालनाला भेट द्यायची ते ठरवितात. प्रदर्शनासंबंधीची सर्व माहिती आमच्या ऑनलाईन पोर्टलवर अपलोड केली जाते आणि ती पाहून प्रदर्शन सुरू होण्याआधीच कोणताही पाहुणा स्वतःचे वेळापत्रक ठरवू शकतो. या मंचाद्वारे भेट देणारे प्रदर्शनकर्त्यांच्या संपर्कात येतात आणि त्यांनी प्रदर्शित केलेली उत्पादने आणि तंत्रज्ञान यांच्याविषयी अधिक जाणू शकतात. IMTMA ने प्रदर्शनकर्ते आणि प्रदर्शनाला भेट देणारे यांच्यात परस्पर संवाद घडवून आणण्यासाठी एक एक्स्पो प्लॅटफॉर्म निर्माण केला आहे. प्रदर्शनकर्ते प्लॅटफॉर्मवर आपोआप नोंदविले जातात आणि स्वतःची उत्पादने अपलोड करू शकतात. या प्लॅटफॉर्मवर नोंद केलेल्या पाहुण्यांना विशिष्ट उत्पादनाविषयीची माहिती मिळविता येते आणि पुढील कामांची चर्चा करता येते.

**सहभाग घेणाऱ्यांकडून त्यांच्या अपेक्षा आणि अभिप्राय गोळा करण्यासाठी आपण कोणती यंत्रणा इम्टेक्सच्या पूर्वी आणि नंतर राबविता? इम्टेक्सचा दर्जा वाढविण्यात आपण त्याचा कसा उपयोग करता?**

प्रदर्शनामध्ये सहभाग घेणाऱ्यांकडून त्यांच्या अपेक्षा आणि अभिप्राय गोळा करण्यासाठी आम्ही एक अंतर्गत प्रक्रिया तयार केली आहे आणि प्रत्येक पुढील वर्षाच्या प्रदर्शनाचा दर्जा सुधारण्यासाठी आम्ही आवश्यक पावले उचलत असतो.

**मागील काही वर्षांत इम्टेक्समध्ये सहभागी होणाऱ्यांमध्ये आपल्याला काय फरक दिसतो, तो कृपया आम्हाला सांगा.**

प्रदर्शनकर्ते आणि भेट देणारे यांच्यापर्यंत माहिती पोहोचविण्याच्या बाबतीत तंत्रज्ञानाने विलक्षण भूमिका बजावली आहे. सोशल मीडिया आणि विविध डिजिटल माध्यमे पारंपरिक जाहिरातींना पूरक बनताना दिसत आहेत. या प्लॅटफॉर्मविषयीची महत्त्वपूर्ण गोष्ट ही की, यातून प्रदर्शनकर्ते आणि भेट देणारे यांच्यात परस्पर थेट संवाद घडण्याचे वातावरण निर्माण होत आहे.



# BIEC Site Plan






**अन्य जागतिक प्रदर्शनांच्या तुलनेत आपण इम्टेक्सला काय मानांकन द्याल?**

इम्टेक्स हे जर्मनी, जपान, अमेरिका इत्यादी देशांमध्ये भरविल्या जाणाऱ्या आघाडीच्या जागतिक मशिन टूल प्रदर्शनांपैकी एक म्हणून ओळखले जात आहे. इतर आंतरराष्ट्रीय मशिन टूल प्रदर्शनांप्रमाणेच इम्टेक्सच्या स्वतःच्या अशा काही जमेच्या बाजू आहेत, ज्यामुळे त्याचा वेगळेपणा उठून दिसतो आणि त्यामुळे ते दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशियातील अग्रगण्य मशिन टूल प्रदर्शन बनले आहे.

**आपण इम्टेक्समध्ये नवीन तंत्रज्ञानाला कसे प्रोत्साहन देता?**

इम्टेक्सला यंदा 50 वर्षे पूर्ण होत आहेत. ते साजरे करण्यासाठी आम्ही दोन नवी दालने भरविण्याची घोषणा केली आहे. ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग आणि इंडस्ट्री 4.0 यासाठी दोन स्वतंत्र दालने यंदा असतील. ही तंत्रज्ञाने उत्पादनाला नवी गती देत आहेत आणि उत्पादन क्षेत्रातील उलाढाल वाढविण्यात मोठी भूमिका बजावतील अशी अपेक्षा आहे.

इंडस्ट्री 4.0 चे दालन उत्पादनक्षम वातावरणाला आवश्यक अशी विविध तंत्रज्ञाने एकत्रपणे प्रदर्शित करेल. इंडस्ट्री 4.0 एक्स्पो, इंडस्ट्री 4.0 च्या अंमलबजावणीतील सर्व पैलू एकाच जागी पाहण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी एक प्लॅटफॉर्म म्हणून कार्य करेल. यात सेन्सर, ॲनालिटिक्स, कनेक्टिव्हिटी, ऑटोमेशन, स्मार्ट मशिन, डिजिटलायझेशन, IoT, सायबर सुरक्षा इत्यादींचा समावेश असेल.

ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंगच्या एक्स्पोमध्ये उत्पादन क्षेत्रातील व्यावसायिकांना ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंगच्या टेक्नो-कमर्शियल लाभांविषयी जवळून माहिती दिली जाईल. या दालनामध्ये निरनिराळे कक्ष असतील, ज्यात उत्पादनातील विकास, अभियांत्रिकी आणि उत्पादनातील नूतनीकरण आणि ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंगद्वारे विकसित केलेली उत्पादने यांच्या विविध पैलूंवर लक्ष केंद्रित केले जाईल.